INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
(Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal)
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

महात्मा जोतीराव फुले यांचे लिखाण आणि राष्ट्रीय चळवळ

डॉ. विक्रम श्रीरंग जाधव

मराठी विभाग प्रमुख

सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड आर्टस, पुणे

DOI No. 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/10.2021-44433795/IRJHIS2110005

सारांश:

अखंड हा जोतीरावांचा पद्यात्मक स्वरूपाचा ग्रंथ आहे. त्यांचे अनेक पद्यवाङ्मय उपलब्ध आहे. त्याची पद्यरचना शिवाजीचा पवाडा, ब्राह्मणांचे कसब या दोन पुस्तीका बहुतांशी स्फूट स्वरूपाच्या जुन्या अभंगवाङ्मयाच्या पद्धतीने आहेत. मात्र या सर्व रचनालेखनाला अखंड हे नाव दिले आहे. यात अनेक विषय घेवून लेखन केले आहे. आत्मपरीक्षण, धीर, समाधान, सद्विवेक नीती, मानवाचा धर्म एक इत्यादी विषय घेवून केले आहे. तसेच गणपती ब्राह्मणांचा भोदूपणा, भटाची वाणी तर बळी राजा, मानव इत्यादी थोर महापुरूषांची महती ही सांगितली आहे. काही निवडक रचना म्हणजे तत्कालीन प्रसिद्ध व्यक्तींना लिहिलेली पत्रच होय उदा. सयाजीराव गायकवाड यांचा उल्लेख करता येईल. एकूणच हे सर्व लेखन पाहाता गद्याबरोबर पद्याचे माध्यम ही स्वीकारलेले दिसते.

अशा प्रकारच्या लेखनीवरून त्यांच्या आयुष्यभराच्या प्रवासाची वाटचाल कशी होते हेच स्पष्ट दिसून येते. लेखनीतील तत्त्वचिंतनाचा, आक्रमकता ही क्वचित प्रसंगी, सरळ सहजस्फूर्त अशीच रचना पाहावयास मिळते. त्यांनी धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय अशा अनेकविध विषयांची उकल त्यांनी केली. त्यांनी जातीजमातीत विखुरलेल्या कष्टकरी लोकांन एकत्र आणून त्यांच्यात ऐक्यभाव घडविला पाहिजे. सर्वांनी मिळून दास्यमुक्तीसाठी सतत झगडत राहिले पाहिजे. हाच जोतीरवांच्या विचार तत्त्वाचा गाभा गाहे. त्याचाच त्यांच्या ग्रंथलेखनात विविध रूपात अविष्कार दिसून येतो.

प्रस्तावना :

महात्मा जोतीरावांच्या चळवळीचे एक प्रमुख अंग म्हणजे दलितमुक्तीचा प्रसार आणि बहुजन समाजाचे प्रबोधन होय. त्यासाठी जोतीरावांनी काही लहानसोठी पुस्तके लिहिली आहेत. त्यांच्या या लेखनीवरून त्यांच्यातील सत्यशोधक समाज पाहावयास मिळतो. तसेच तत्कालीन उच्चवर्णीय लेखकापेक्षा वेगळे भिन्न स्वरूपाचे साहित्यलेखन केले. वास्तविक पाहता १९ व्या शतकातील मराठी साहित्य पाहिले तर ते उच्चवर्णीय आणि मध्यमवर्गीय स्वरूपाचे दिसून येते. त्यामध्ये थोडया फार प्रमाणात ग्रामीण भागाचे तसेच गरीब शेतकरी, कारागीर इत्यादीचे चित्रण क्वचित आढळून येते. त्यामुळेच की काय जोतीरावांनी आपले संपूर्ण लक्ष बुद्धिजीवी लोकांकडून कामगार लोकांकडे वेधले होते. त्यांनी शेतकरी आणि कष्टकरी या दोन बिंदूला केंद्रस्थानी मानून आपली वाटचाल केली. त्यांनी स्वतः लेखनी हाती घेवून या व्यवस्थेचे लक्तरे वेशीवर मांडली आहेत. शुद्र, अतिशुद्र समाजातील नवीन मुले शिकून अक्षरओळख करून देण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. जोतीरावांनी आपल्या लेखनीतून पुढील ग्रंथसंप्रदा निर्माण केली.

तृतीय रत्न नाटक (पुणे १८५५), पवाडा छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा (मुंबई १८६९), ब्राह्मणांचे कसब

(मुंबई १८६९), गुलामगिरी (पुणे १८७३), शेतकऱ्याचा आसूड (पुणे १८८३), सत्सार अंक १,२ (पुणे १८८५), इशारा (पुणे १८८५), सार्वजनिक सत्यधर्म (मुंबई १८९१), अखंड (काव्यरचना – स्फूट) पुणे, इत्यादी ग्रंथलेखन महात्मा जोतीराव फुले यांनी केले आहे. त्याचबरोबर तत्कालीन समाजव्यवस्थेतील अतिशय महत्त्वाचा ग्रंथ त्यांनी स्वतः प्रकाशित केला. तो म्हणजे 'जातिभेद विवेकसार' (आवृत्ती दुसरी) आणि 'एक हिंदू' अशी दोन स्वतंत्र पुस्तके स्वतः प्रकाशित केली आहेत. त्यापैकी आपण त्याच्या पुस्तकांचा विचार पुढीलप्रमाणे करू.

'तृतीय रत्न' हा ग्रंथ १८५५ साली लिहिला आहे. मराठीतील बहुधा हे पहिलेच स्वतंत्र सामाजिक नाटक होय. मराठी साहित्य विश्वातील अतिशय महत्त्वाचे नाटक म्हणून स्वीकारले आहे. जोतीरावांनी या नाटकातून प्रचलित असणारी भट ब्राह्मण व्यवस्था व अज्ञानी शुद्र एकमेकांना कसे फसवितात. तसेच धर्माचा आधार घेवून अज्ञानी शुद्रास चांगल्या मार्गावर आणण्याचा प्रयत्न दिसतो. अलीकडच्या काळात इ. स. १९७९ मध्ये त्यांनी महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठान पुणे या संस्थेची स्थापना केलेली आहे. या प्रतिष्ठानाच्या माध्यमातून त्यांनी पुढे मपुरोगामी सत्यशोधकफ हे त्रैमासिकही प्रसिद्ध केले. त्याचे संपादन प्रा. सीताराम रायकर यांनी केले. दरम्यान तत्कालीन पुस्तकेही जाहीरात केली जात होती परंतु संपादकाने मात्र काही बदल सूचविले होते. त्यांनी या नाटकाचे कथानक साधे सोपे ठेवले आहे. नाटकात काही मोजकेच प्रसंग निर्माण केले आहेत. 'नाटकात कुणबी स्त्री, नवरा, जोशी, त्याची पत्नी, विदूषक, भाऊ दामू, पाद्री आणि एक मुसलमान एवढीच पात्र दिसून येतात'.[१]

तृतीयरत्न नाटकात जोगाई ही कुणबी स्त्री गरोदर दिसते. आपले अपत्य उत्तम व्हावे म्हणून देवदेवता पूजा करण्यासाठी तिला ब्राह्मण गुरूजी उत्तेजित करतात. ती याला बळी पडते. त्यात तिचा अनाठायी खर्च होतो. यातून बाहेर पडण्यासाठी अशी गोर गरीब लोकांनी शिकले पाहिजे, ही भूमिका या नाटकाच्या माध्यमातून पुढे येते. त्यासाठी स्वतः सावित्रीबाई फुले यांनी उपवर स्त्रियांना रात्रीचे शिक्षणाचे धडे त्याकाळी दिले. पुढे त्यांनी प्रौढ शिक्षणही सुरू केले.

तृतीयरत्न नाटकातील काही तंत्रविषयक दोषही आढळतात. मात्र यातील संवादरचना ही अत्यंत सुटसुटीत, अकृत्रिम, आशयघन स्वरूपाचे असल्याचे दिसून येते. हे नाटक त्यावेळी दक्षिणा प्राहस समितीकडे पुरस्कारासाठी पाठविले पण तत्कालीन समितीने नापसंत दिली हे चित्र पाहावयास मिळते. कदाचित जोतीरावांनी वर्णवर्चस्वावर आणि भिक्षुकशाहीवर जोरदार हल्ला या नाटकात केल्यामुळे, त्याचाही परिणाम दिसून येतो.

छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा (१८६९) साली प्रसिद्ध झाला. आधुनिक मराठी साहित्यात शिवछत्रपती यांचे कर्तुत्व आणि पराक्रम याकडे लोकांचे लक्ष वेधण्यात जोतीराव यशस्वी झाले. त्यांनी हा पवाडा परमहंस सभेचे अध्यक्ष रामचंद्र बाळ कृष्णजी यांना अर्पण केला. त्यांनी हा पवाडा तयार करताना आपल्या समोर कोणता वर्ग होता हे आपल्या प्रस्तावनेत नमूद केले आहे. "शिवाजी राजाच्या ह्या पवाड्याचे आठ भाग केले आहेत. दर एक भागात विषयांतर होऊ नये या भयास्तव सर्व भाग एकसारखे केले नाहीत .....माळी कुणब्यांस समजण्यायोगी सोपी भाषा होण्याविषयी फार श्रम करून त्यांस आवडण्याजोग्या चालीने रचना केली आहे" या पवाड्यात जोतीरावांनी शिवचरित्रातील महत्त्वाचे सर्व प्रसंग सहज, सरळ प्रवाही शैलीत मांडलेले दिसतात. मात्र त्यामध्ये सामाजिक दृष्टिकोन

दिसतो. पवाड्याची निर्मिती त्यांनी "कुळवाडी भूषण पवाडा गातो भोसल्याचा । छत्रपती शिवाजीचा" अशी रचना केली आहे. शेवटच्या रचनेत "जोतीराव फुल्याने गाईला पुत क्षुद्राचा । मुख्य धनी पेशव्याचा"[२] असे म्हटले आहे. या पवाड्याचा कर्ता हा मकुळवाडी भूषणफ शेतजमीन कसणारा समाज प्रतिनिधी आहे. कष्टकरी शाहीर आहे. असाच अर्थ सूचित होतो. शिवाजीचा उल्लेख त्यांनी पराक्रमी शूद्राचा पुत्र व पेशव्याचा मुख्य धनी असा केला आहे. त्यांनी शूद्र हेच येथील मूळचे रहिवासी असा दावाही केला आहे. परंतु पुढे दुसऱ्या देशातून आर्यब्राह्मण या देशात आले. त्यांनी येथील लोकांना जिंकून गुलाम बनविले ज्यांना आज आपण शूद्र तुच्छ लेखतो तेच शत्रूशी लढले आहेत. म्हणूनच त्यांना आर्यब्राह्मण यांनी अस्पृश्य शिक्का लावला आहे.

जोतीरावांच्या पद्यरचनेत प्रखर सहजता आहे. पद्यातील रूप वर्णने मात्र सांकेतिक असल्याचे दिसते. मात्र कुठेही कृत्रिमता किंवा खडबडीतपणा दिसत नाही. त्यांच्या पद्याची चर्चा खास काही वैशिष्टये म्हणजे अतिशय सोपेपणा, समर्पकता त्याचबरोबर बुद्धिमत्ता, चातुर्य, कर्तबगारी, सावधपण, निर्लेभवृत्ती, उदारता लोकसंग्रह इत्यादी गुण वैशिष्टये सांगता येतील.

'ब्राह्मणांचे कसब' हा ग्रंथ इ. स. १८६९ साली प्रकाशित झाला. हा ग्रंथ महाराष्ट्रातील कुणबी, माळी, मांग, महार यांना समोर ठेवून लिहिला आहे. त्यांनी ग्रंथात येथील भट जोशी अडाणी गरीब शूद्राला धर्माच्या नावाखाली भूलथापा सांगून कसे राजरोस लुटतात हे दाखवून दिले आहे. आपल्याकडे आर्य लोक येण्यापूर्वी येथील लोक मूळच्या राजवटीत सुखी समाधानी होता. पण या आर्यब्राह्मणांनी हा देश हळूहळू काबीज केला. येथील लोकांना गुलाम केले. आपले वर्चस्व राखण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्याचबरोबर धर्म टिकविण्याचा प्रयत्नही झाला. त्यामुळे भट-भिक्षुकांची चांगली परिस्थिती निर्माण झाली. त्यांनी काही धार्मिक विधी बारा महिने घराघरात चालू केले. त्या निमित्ताने भरपूर दक्षिणा आणि भोजन असा दुहेरी लाभ भट जोशी यांनी मिळविला. निरक्षर माणसे प्रचलित भट ब्राह्मणांचे सर्व ऐकतात. वेळ प्रसंगी स्वतःची शेतजमीन ही गहाणखत करून देतात. शेवटी कुटुंबाची मालमत्ता निःशंकपणे गिळंकृत करतात.[३] आपल्या सांस्कृतिक परंपरेतील ब्राह्मण व विद्येची मक्तेदारी मागासलेल्या जातीतील अज्ञान अंधश्रद्धा रूढीप्रियता ही लक्षात घेतली की, 'ब्राह्मणांचे कसब' या ग्रंथातील जोतीरावांच्या प्रतिपादनात पुष्कळच तथ्य आहे असेच म्हणावे लागेल.

'गुलामगिरी' हा ग्रंथ इ. स. १८७३ मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथाच्या नावावरून आपणास धार्मिक, सामाजिक, आर्थिक किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाची असा त्याबद्दल जोतीरावांच्या मनात राग दिसतो. जोतीरावांनी हा ग्रंथ अमेरिकेतील यादवी युद्ध झाले त्याचा आपल्या अर्पणपत्रिकेत उल्लेख करून नमूद केले आहे. युनायटेड स्टेटसमधील सदाचारी लोकांना गुलामांस दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या काळात औदार्य, निरपेक्षता व परोपकारबुद्धी दाखविली यास्तव त्यांच्या सन्मानार्थ महात्मा फुले यांनी अर्पण केला आहे. हा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून आपल्या समाजातील शुद्र लोकांची ब्राह्मण लोकांच्या गुलामगिरीतून सुटका करतील अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. जोतीरावाने मत्स्य, कच्छ, वराह, नरसिंह, वामन, परशुराम इ. पौराणिक कथांची छाननी करून आर्य आणि मूळचे लोक यांच्यातील

दीर्घकाळ संघर्ष परखड शब्दांत स्पष्ट केला आहे. नरसिंह आणि वामन यांनी आपल्या शत्रूचा नाश करण्यासाठी कपटनितीचा वापर केला आहे. परशुरामाने स्वतःच्या आईचीही पर्वा केली नाही. आर्यांच्या धर्मग्रंथांना त्यांना साक्षात आदिनारायणाचे, भगवान विष्णूचे अवतार म्हणून गौरविले आहे.

आर्यांचा विजय झाल्यावर त्यांनी तेथील लोकांना तुच्छ लेखून आपल्या सुखस्वास्थासाठी त्यांना गुलामाप्रमाणे रात्रंदिवस कष्टाची कामे करून घेतली. त्यांना विद्येचे दरवाजे कायमचे बंद करून टाकले. इंग्रजी राजवटीतही तिच्यात फारसा बदल झाला नाही. उलट विद्येची परंपरा पाठीशी असल्याने ब्राह्मण व तत्सम जातीनाच अधिक लाभ झाला. नव्या शासनव्यवस्थेत लहानमोठी अधिकारपदे त्यांनाच मिळाली. त्याचबरोबर सामाजिक क्षेत्रातही त्यांचेच वर्चस्व राहिले. न्यायाधीश, वकील, सावकार, कुलकर्णी, डॉक्टर, इंजिनियर, शिक्षणाधिकारी, शिक्षक, पत्रकार, मामलेदार, पंडित, पुरोहित, फौजदार इत्यादी सामाजिक जीवनातील बहुतेक सर्व अधिकार त्यांच्या ताब्यात होते. ब्रिटीश अधिकारीही ते सांगतील त्याप्रमाणे वागताना दिसतात. तेव्हा खरे सत्ताधारी हे ब्राह्मण असल्याचे दिसून येते. एकूणच जोतीरावांनी बहुजन समाजात झपाट्याने शिक्षणाचा प्रसार करून, त्यांनी शासकीय यंत्रणेत सहभाग घेतल्याशिवाय परिस्थिती बदल होणार नाही असेच सूचित करतात.

'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ इ. स. १८८३ मध्ये लिहिला आहे. परंतु हा ग्रंथ पुस्तक रूपाने जोतीराव यांच्या हयातीत प्रसिद्ध झाला नाही. जोतीरावाने या ग्रंथाचे लिखित मूळ तत्कालीन गव्हर्नर आणि दुसरी नक्कल प्रत सयाजीराव गायकवाड यांना पाठविली होती. नंतरच्या काळात म्हणजेच इ. स. १९६७ मध्ये मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या मराठी संशोधन मंडळाने प्रथम प्रकाशित केला. या ग्रंथाचे संपादन डॉ. स. गं. मालशे आणि श्री. धनंजय कीर या दोन मान्यवरांनी केले.

या ग्रंथात जोतीरावांनी सर्व बाजूंनी मांडलेल्या महाराष्ट्रातील गरीब शेतकऱ्याची केविलवाण्या जीवनक्रमांचे दर्शन घडविले आहे. त्यामुळे हा ग्रंथ परिचयात्मक तसेच वर्णनात्मक स्वरूपाचा झाला आहे. ग्रंथातील जोतीरावांची लेखनाची शैली तिखट, तेज, धारदार प्रवाही स्वरूपाची झाली. वास्तविक हा ग्रंथ शेतीविषयक प्रश्नांना वाहिलेला आहे. यातील प्रदेश हा शेतकऱ्यांची इतकी दुर्दशा कशामुळे झाली, त्याला जबाबदार कोणकोण आहे, त्याचा स्वतःचा दोष किती इत्यादी प्रश्नांची चर्चा आहे. शेवटी काही उपाययोजनाही सूचविल्या आहेत. शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेची जी अनेकविध कारणे आहेत त्यापैकी धर्म व राज्य या दोन गोष्टीशी निगडीत आहेत. त्यामुळे आपल्यावर काही अन्याय होण्याचा संभव आहे ही कल्पनाच मुळी त्यांच्या मनाला कधी शिवली नाही. साहजिकच ब्राह्मण व सरकारी अधिकारी यांच्याकडून कितीही जाच वा जुलूम झाला तरी तो आपल्या नशिबाचा भाग म्हणून निमुटपणे सहन करणे ही सवय झाली होती. एकूणच काय, 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' अशी अवस्था झाली होती. त्याचे मूळ अज्ञानात, अशिक्षितपणात दिसून येते. त्यांनी या ग्रंथाच्या प्रारंभीच असे म्हटले,

"विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली !
गतीविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले" [४]

असे महत्त्वपूर्ण उद्‌गार सूचित केले.

फुलेंनी सामाजिक जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमधून होणाऱ्या आर्थिक शोषणाकडे लक्ष वेधले आहे. शेतकऱ्यांच्या आसूडाचे फटके प्रस्थापित व्यवस्था तसेच इथल्या परिस्थितीचे अपुरे ज्ञान असलेले ब्राह्मणधार्जिण, गोरेसाहेब, लाचखाऊ अधिकारी इत्यादीचा जोतीरावांनी रोखठोक समाचार घेतला आहे. समाजातील शुद्रातिशुद्रांची परिस्थिती बदलायची असेल तर शिक्षणविषयक धोरणाची फेररचना करण्याची विनंती केली आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांनीही अज्ञान, आळस, धर्मभोळेपणा, व्यसनासक्ती इत्यादी दोष काढून टाकले पाहिजेत. याचीही जाणीव करून दिली आहे.

'इशारा' ही पुस्तिका इ. स. १८८५ साली प्रसिद्ध झाली. ब्रिटिशपूर्व काळात म्हणजेच प्राचीन काळापासून येथे जे राज्यकर्ते होऊन गेले, त्यांनी जनतेच्या कल्याणाकडे लक्ष दिले नाही. जनता या शब्दात जोतीरावांनी फक्त शूद्र आणि अतिशूद्र यांचाच अंतर्भाव केला आहे. आर्य ब्राह्मण आणि मुसलमान हे ब्रिटिशपूर्व कळातील दोन प्रमुख राज्यकर्ते होते. त्यांच्या नेतृत्वाखाली जनतेला खूपच अन्याय सोसावा लागला. दरम्यान काही काळाने ब्रिटिश कारकीर्द सुरू झाला. मात्र या परिस्थितीत पुष्कळच बदल झाला. नवी शासन पद्धती सुरू झाली. शेतकऱ्याला आवश्यक असलेली व्यवस्था निर्माण झाली. त्यांनी कालवे काढून शेतीला पाणीपुरवठा केल्याने चांगले दिवस आले. त्यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्नही वाढले आहे. मात्र याचा फायदा थोडया लोकांना झाला. आजही बहुसंख्य शेतकरी पीक पाण्यासाठी पावसावर अवलंबून राहतात. पाऊस झाला नाही तर मोठी पंचाईत होते. मागील वर्षीचे साठविलेले अन्नधान्य निर्वाहासाठी उपयोगी पडते. शेतकऱ्यांची स्थिती सुधारली आहे की नाही? असा दुसरा प्रश्न उपस्थित केला आहे. काही थोडया शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली असेल, परंतु त्यांच्यापैकी फार मोठा समुदाय अद्याप बिकट अवस्थेत आजही आहे.

जोतीरावांनी इ. स. १८८५ साली मसत्सारफ हे नियतकालिक नव्याने सुरू केले. नियतकालिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. तेव्हा या नियतकालिकाचे मोठे कौतुक झाले. समाजातील सर्व जाती धर्मातील लोकांनी या अंकाचे स्वागत केले. त्याचबरोबर ही परंपरा कायम चालू ठेवण्याचा आग्रह धरला, जोतीरावांनी पुढे चालू ठेवण्याचे आश्वासनही दिले. अंक प्रकाशित झाल्यानंतर एक महिन्यात १०५० अंकाच्या प्रती संपल्या आहेत. त्यानंतर दुसरा अंक देखील एवढा प्रतिसाद पाहून तयार झाला. यावरून जोतीरावांचे चाहते व हितचिंतक मोठया संख्येने असल्याचे दिसून येते.

पहिल्या अंकात ब्रह्मसमाज व प्रार्थनासमाज तसेच विविध जातीतील स्त्रीपुरूषांच्या संततीचे सामाजिक स्थान, आर्यभटांची धर्मकल्पना या तीन प्रश्नांची संगती घेवून त्यांना संपूर्ण उहापोह केला आहे. त्यांना आजपर्यंत अन्यायाने अस्पृश्य म्हणून दूर फेकलेल्या आपल्या अस्पृश्य बांधवांना ते दैनंदिन व्यवहारात बरोबरीने वागवत नाहीत. आपल्या धार्मिक व सामाजिक कार्यात सहभागी करून घेत नाहीत अशी प्रखर तक्रार जोतीराव करतात. "आता आम्हाला तुमचे ब्राह्मसमाज व प्रार्थना नकोत असे स्पष्टच सांगून टाकतात." [५] वास्तविक पाहाता सत्सारचे दोनच अंक आतापर्यंतच्या संशोधन साहित्यात उपलब्ध आहेत. दुसऱ्या अंकात खास काही वेगळ्या विषयाची चर्चा दिसत नाही. त्यातील काही लेख कुऱ्हाडीचा दांडा गोतास कळ असा लिहिला आहे. यात एक आडमूठया वर्तमानपत्रकर्त्यावर नाव उघड न करता अत्यंत कठोर शब्दांत टीका केली आहे. एकंदर स्त्री जाती विषयीच्या अनुदार वृत्तीबदल फुले त्याचे अक्षरशः वाकडे

काढीत आहेत.

'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ जोतीरावांच्या मृत्यूनंतर म्हणजेच इ. स. १८९१ साली प्रसिद्ध झाला. जोतीरावांना हा ग्रंथ समाजातील आपल्या अनुयायांच्या मार्गदर्शनाखाली लिहिला आहे. त्यावेळी त्यांच्या उजव्या हाताला पक्षवातीने संपूर्ण हात निकामा झाला असतानाही धीर न सोडता त्यांनी डाव्या हाताने हा ग्रंथ लिहून काढला आहे.

या आपल्या अमर्याद विस्तीर्ण पोकळीमध्ये निर्मिकाने अंनत सूर्यमंडळांसह त्यांच्या ग्रहोपग्रहासहित तत्संबंधी एकंदर सर्व प्राणिमात्रांस उत्पन्न केले आहे. त्यापैकी आपण सर्व मानव स्त्रीपुरूषांनी त्याविषयी कायकाय करावे आणि आपण सर्व एकंदर मानव स्त्रीपुरूषांनी त्याचे स्मरण मनी जागृत ठेवून एकमेकांशी कोणत्या तऱ्हेचे आचरण केल्यामुळे त्यास आनंद होणार आहे. यास्तव मी त्याच्या कृपेने एकंदर सर्व मानव स्त्रीपुरूषांच्या हितासाठी हा लहानसा ग्रंथ रचिला आहे. याचा अर्थ असा की जोतीरावांनी आपला संपूर्ण उद्देश आपल्याच प्रास्ताविकात नमूद केला आहे. या ग्रंथात धर्मविषयक विचारांचे सार थोडक्यात पण नेमक्या शैलीत सांगितले आहे. हा ग्रंथ सर्वसामान्य लोकांना वाचन मनन करता यावा म्हणून थोडक्यात आटोपशीरपणा समोर ठेवून लिहिला आहे. तत्कालीन शूद्रामिशूद्रांना धर्मसाधनेचा अधिकार नाही. फक्त हिंदू परंपरेने, पूजा अर्चा जपजाप्य, तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये, दानधर्म, नामस्मरण इत्यादी गोष्टींचा समावेश दिसतो. या सर्व गोष्टीबद्दल जोतीरावांनी निर्भीडपणे ऊहापोह केला आहे. शिवाय खऱ्या ईश्वर भक्तीचे रहस्य सांगितले आहे. त्याचबरोबर आपल्या विवेचनात सत्यनिष्ठा व नीतीमत्ता या दोन गोष्टींचा जिव्हाळ्याचा संबंध हेही पटवून देतात. आपल्या सामाजिक जीवनात धार्मिक विधींना सोडून चालणार नाही याची जाणीव होती. म्हणून जन्म, लग्न, अंत्यक्रिया, श्राद्ध इत्यादी मोजके विधी अगदी साधेपणाने शुद्ध मनाने करावेत याचाही खुलासा ग्रंथाच्या उत्तर भागात केला आहे.

'अखंड' हा जोतीरावांचा पद्यात्मक स्वरूपाचा ग्रंथ आहे. त्यांचे अनेक पद्यवाङ्मय उपलब्ध आहे. त्यांची पद्यरचना 'शिवाजीचा पोवाडा', 'ब्राह्मणांचे कसब' या दोन पुस्तिका बहुतांशी स्फूट स्वरूपाच्या जुन्या अभंग वाङ्मयाच्या पद्धतीने आहेत. मात्र या सर्व रचना लेखनाला अखंड हे नाव दिले आहे. यात अनेक विषय घेवून लेखन केले आहे. आत्मपरीक्षण, धीर, समाधान, सद्विवेक नीती, मानवाचा धर्म एक इत्यादीचा समावेश आहे. तसेच गणपती ब्राह्मणांचा भोदूपणा, भटाची वाणी तर बळी राजा, मानव इत्यादी थोर महापुरूषांची महती ही सांगितली आहे. काही निवडक रचना म्हणजे तत्कालीन प्रसिद्ध व्यक्तींना लिहिलेली पत्रच होय. उदा. सयाजीराव गायकवाड यांचा उल्लेख करता येईल. एकूणच हे सर्व लेखन पाहता गद्याबरोबर पद्याचे माध्यमही स्वीकारलेले दिसते.

अशा प्रकारच्या लेखनीवरून त्यांच्या आयुष्यभरच्या प्रवासाची वाटचाल कशी होते हेच स्पष्ट दिसून येते. लेखनीतील तत्त्वचिंतनपणा, आक्रमकता ही क्वचित प्रसंगी, सरळ सहजस्फूर्त अशीच रचना पाहावयास मिळते. त्यांनी धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय अशा अनेकविध विषयांची उकल त्यांनी केली. त्यांनी जातीजमातीत विखुरलेल्या कष्टकरी लोकांना एकत्र आणून त्यांच्यात ऐक्यभाव घडविला पाहिजे. अस्पृश्य बांधवांना बहिष्कृत न मानता त्यांच्याशी बंधुभावाने वागण्यास प्रारंभ केला पाहिजे. सर्वांनी मिळून दास्यमुक्तीसाठी सतत झगडत राहिले पहिजे. हाच जोतीरावांच्या विचार तत्त्वाचा गाभा आहे.

संदर्भ व टीपा :

१) कीर धनंजय, स. गं. मालशे, 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीय आवृत्ती १९८०, पृ. क्र. ५०६.

२) उनि पृ. क्र. ०९.

३) गुंदेकर श्रीराम, 'म.जोतिबा फुले साहित्य आणि साहित्यमूल्ये', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००२, पृ. क्र. १३०.

४) वीर धनंजय, 'म.जोतिबा फुले साहित्य आणि साहित्यमूल्ये', प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती १९८०, पृ. क्र. १८९.

५) उनि पृ. क्र. २८१.